सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४०० ६१४
टोल फ्री क्र. १८०० २२२ ०१९
दूरध्वनी क्र. ०२२-२७५६ १८२४
Web site : www.mahaawaas.org
Email ID : directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र.राव्यक-ग्रागृ/आस्थापना/ग्रा.गृ.अ.मानधन/२०२४/20। दिनांक : ३०.०१.२०२४

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय:- राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (RHE) यांच्या कामकाजाबाबत.**

**संदर्भ-** १. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१६/प्र.क्र.३९/यो-१०, दि. २७.०५.२०१६.
२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएवाय-जी-२०१८/प्र.क्र.२४५/योजना-१०, दि.२५.०९.२०१८.
३. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्रआयो/प्र.क्र.९३/योजना-१०, दि.१२.११.२०२१.

उपरोक्त संदर्भ क्र.१ आणि २ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांची पाहणी करणे व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे याकरिता १६०० ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरणेकरिता मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यात जिल्हास्तरावर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता कार्यरत आहेत. सदर अभियंत्यांच्या **कर्तव्य आणि जबाबदाऱ्या** संदर्भ क्र. ३ मध्ये विहित केलेल्या असून त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना कामाचे वाटप करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (MGNREGA) अभिसरणातील अकुशल कामाच्या नोंदी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे सोपविण्याबाबतचा निर्णय दिनांक २०.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच याबाबत कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १२.११.२०२१ (मुद्दा क्र.ड) मध्ये नमूद करण्यात आले आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुल बांधकामाचा भाग वगळता जिल्हा व तालुकास्तरावर इतरही कामकाजामध्ये सहभागी होण्याबाबत सांगण्यात येते. तसेच MGNREGA अभिसरणातील अकुशल कामाच्या नोंदी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी केल्यानंतरही त्यांना त्यांचे देय मानधन दिले जात नाही.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने ग्रामीण गृहनिर्माण अभियंता हे पद महत्वाचे आहे. त्यांच्या कामकाजामध्ये क्षेत्रीय स्तरावरील भेटी देऊन घरकुलाच्या बांधकामासंदर्भात आढावा घेऊन, त्यानुषंगाने पुढील नियोजन करणे अपेक्षित आहे. ही बाब विचारात घेऊन त्यांची जिल्हा / तालुका मुख्यालयामध्ये दररोज उपस्थिती अपेक्षित नाही.

वास्तविक पाहता, ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये कामाचे वाटप पुढीलप्रमाणे अपेक्षित आहे.

१. ग्रामपंचायतस्तरावर घरकुल पात्र लाभार्थी यांचे प्रस्ताव तयार करून तालुकास्तरावर सादर करणे - ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी.
२. तालुकास्तरावर प्राप्त प्रस्तावांची छाननी करणे, लाभार्थी यांची कागदपत्रे जमा करून आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड करून नोंदणी (Registration) करणे, लाभार्थी प्रस्ताव अंतिम मंजूरीकरिता जिल्हास्तरीय समितीकडे सादर करणे - तालुका डेटा एंट्री ऑपरेटर व संबंधित विस्तार अधिकारी, पंचायत समिती.
३. जिल्हास्तरावर प्राप्त प्रस्तावांना ऑफलाइन / ऑनलाइन मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करणे — जिल्हास्तरीय प्रोग्रॅमर व जिल्हास्तर डेटा एंट्री ऑपरेटर.
४. मंजुरीनंतर पहिला हप्ता वितरण व गरजेनुसार उर्वरित हप्ते वितरण - तालुका डेटा एंट्री ऑपरेटर व सहाय्यक लेखा अधिकारी, पंचायत समिती.
५. प्रत्यक्षात घरकुलांना ऑनलाइन मंजूरी मिळाल्यानंतर घरकुल बांधकामाचे लेआउट देणे, लाभार्थ्यांना बांधकाम विषयक मार्गदर्शन करणे आणि घरकुल पूर्णत्वाचे टप्पानिहाय फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड करणे - ग्रामीण गृहनिर्माण अभियंता.

तरी, याप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या मनुष्यबळाचा यथोचित वापर करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (MGNREGA) अभिसरणातील अकुशल कामाच्या नोंदी करण्याकरिता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना देय मानधन अदा करण्याची कार्यवाही करणेकरिता आपले स्तरावरून सर्व संबंधितांना सूचित करण्यात यावे, ही विनंती.

**(डॉ. राजाराम दिघे)**
**संचालक**
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत** : १. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहितीसाठी.
३. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय सर्व यांना माहितीसाठी.
४. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व यांना माहिती व कार्यवाहीस्तव.